दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे
बीड/महाराष्ट्र गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष २ रे अंक-११७ पाने ४ किंमत ४ रुपये

## आरोप झाला की राजीनामा घेण्याची पद्धत चुकीची

**नांदेड (वृत्तसंस्था)**–बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत असताना भाजप खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आरोप झाले की लगेच राजीनामा घेण्याची पद्धत अत्यंत चुकीची असल्याची भूमिका मांडली आहे. या प्रकरणी त्यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठवत अशा पद्धतीने राजीनामे घेणे हा राजकारणातून उद्धवस्त करण्याचा कार्यक्रम असल्याचा आरोप केला आहे.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली. या हत्याकांडात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांचा हात असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणी बीडच्या सर्वपक्षीय नेत्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. पण मुंडे यांनी या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच योग्य तो निर्णय घेतील असे सांगत त्यांची मागणी धुडकावून लावली आहे. या पार्श्वभूमीवर अशोक चव्हाण यांनी उपरोक्त टीका केली आहे

# एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे पुरस्कारः शरद पवारांच्या हस्ते सन्मान

## मुख्यमंत्री असताना केलेल्या कामाची राष्ट्रीय पातळीवर दखल

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी कॉमन मॅन म्हणून महाराष्ट्रातील जनतेसाठी तसेच येथील शेतकऱ्यांसाठी अनेक निर्णय घेतले. तसेच त्यांच्या कामाची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली असून त्यांना हा महादजी शिंदे हा पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला आहे.

५ लाख रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह आणि शिंदेशाही पगडी असे महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराचे स्वरुप आहे. सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित याच कार्यक्रमात दिल्लीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा गौरव करण्यात आला. दिल्लीत नवीन महाराष्ट्र सदनात ११ फेब्रुवारी रोजी हा पुरस्कार प्रदान समारंभ पार पडला.यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी म्हटले, शरद पवारांचे सासरे सदाशिव शिंदे हे क्रिकेटमध्ये गुगली टाकायचे. तर पवार साहेबांनी राजकारणात टाकलेली गुगली अनेकांना कळत नाही. कधी कधी बाजूला बसलेल्या लोकांची किंवा बसवलेल्या लोकांनाही त्यांची गुगली कळत नाही. माझ्याबद्दल थोडे वेगळे सांगतो. माझे पवार साहेबांशी प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे त्यांनी मला कधीही गुगली टाकली नाही, यापुढेही टाकणार नाहीत हे नक्की. राजकारणात वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये आपल्याला शिकायला मिळते. वेगवेगळी विचारधारा असली तरी त्यांच्याशी संबंध जपावे लागतात. राजकारणात नाते कसे जपायचे हे पवार साहेबांकडून शिकावे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

महादजी शिंदे यांनी पानिपतमध्ये पराभव झाल्यानंतर अवघ्या १० वर्षांत दिल्लीवर भगवा भडकवला. १० फेब्रुवारी रोजी या पराक्रमाला २५४ वर्षे पूर्ण झाले. अटक ते कटक पर्यत त्यांनी मराठ्यांचा भगवा फडकवला. त्यांनी खऱ्या अर्थाने सगळ्यांना एकत्र आणले. त्यांचे कर्तृत्व हे लोकांसमोर आले पाहिजे. आपल्यासाठी हा पुरस्कार म्हणजे सोन्याचे सलकडे आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्यासाठी अभिमान आहे. माझ्यावर माया असलेल्या हजारो कार्यकर्ते, लाखो कार्यकर्त्यांचा आहे.एकनाथ शिंदे म्हणाले, आपण कधीही राजकारणात पातळी सोडून टीका केली नाही. आपल्यावर अनेक आरोप करण्यात आले, पण त्याला कामाने उत्तर दिले. मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाल्यानंतर हाताशी वेळ कमी आहे हे जाणवले होते. त्यामुळेच पायाला भिंगरी लाऊन काम केले. विकासकामांचा आणि कल्याण कामांचा धडाका सुरू केला.दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या कृतीने संपूर्ण महाराष्ट्राची मने जिंकली आहेत. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्रा गीताने झाले. यावेळी शामिमा अख्तर यांनी महाराष्ट्र गीत गायले. महाराष्ट्र गीत गात असताना उपस्थित सर्वजण खाली बसले होते. मात्र, ही गोष्ट एकनाथ शिंदे यांच्या लक्षात येताच ते स्वतः उभे राहिले आणि त्यांनी इतरांना देखील उभे राहण्यास सांगितले.



## लीनेन्स क्लब आंबाजोगाईच्या स्तन कर्करोग महिला जागरण मोहिमेचा शुभारंभ

### अहिल्या गाठाळ यांचा लातुरात सत्कार संपन्न



**आंबाजोगाई । परवेज पटेल**

लीनेन्स क्लब आंबाजोगाईच्या कॅन्सर विषयी महिला जागरण मोहिमेचा प्रारंभलातूर येथे झालेल्या लीनेन्स क्लबच्या राज्य स्तरीय मेळाव्यात करण्यात आला. या प्रसंगी कॅन्सर पासून सुरक्षित राहण्याच्या सूचनांचे पत्रक प्रकाशित करण्यात आले. त्यात आंबाजोगाईच्या अर्चना स्वामी या कर्करोग ग्रस्त महिलेचे निवेदन आहे. लीनेन्स क्लबच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांचा शपथविधी, कॅबिनेट मिटिंग आणि पी.एस.टी. सेमिनार असा भरगच्च कार्यक्रम लातूर येथील वाडा हॉटेल येथे पार पडला. लीनेन्स डॉ मंजिरी कुलकर्णी व सुनीला नरपन्नवार यांची विशेष उपस्थिती होती. राज्यातील २९ क्लब्सचे पदाधिकारी उपस्थित होते. अहिल्या गाठाळ यांचा सत्कार माँ से बेटी सवाई हा लीनेन्स क्लबचा उपक्रम आहे. त्यात लीनेन्स क्लबच्या सदस्यांच्या कर्तबगार कन्येचा सत्कार केला जातो. आंबाजोगाई लिलेन्स क्लबच्या कोषाध्यक्ष अयोध्या गाठाळ यांची कन्या, आंबाजोगाईची भूमीकन्या आणि लातूरच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांचा लीनेन्स क्लबच्या राज्यस्तरीय मेळाव्यात डॉ मंजिरी कुलकर्णी आणि आंबाजोगाई लीनेन्सच्या अध्यक्ष आशा वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या प्रसंगी कोषाध्यक्ष आयोध्या गाठाळ, सचिव ललिता पुजारी, कॅबिनेट लेनेस गयाताई कराड, डॉ. नयना सिरसाट तसेच सदस्य सुवर्णा देशमुख, सरोज जाजू, वर्षा देशमुख, इंदू गुट्टे, मंगल गोरे, उषा मोहिते, विजया खोगरे, सरस्वती फड, आशा कराड, माधवी झांबरे, रेवती साखरे ह्या आवर्जून उपस्थित होत्या


## महाकुंभ मेळ्याला जाण्याकरीता आजपासून विशेष रेल्वे

**जालना । असलम कुरेशी**

प्रयागराज, उत्तर प्रदेश येथील महाकुंभ मेळ्याला जाण्याकरीता नांदेड-पटणा-नांदेड, औरंगाबाद-पटणा-औरंगाबाद, काचीगुड-पटणा-काचीगुडा आणि सिकंदराबाद-पटणा-सिकंराबाद विशेष रेल्वे प्रयागराज छिवकी मार्गे चालविण्यात येत आहेत.

गाडी क्रमांक ०७०९९ नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री २३.०० वाजता सुटेल आणि पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७१०० पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०४.३० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.




गाडी क्रमांक ०७१०१ औरंगाबाद-पटणा ही विशेष गाडी औरंगाबाद येथून दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ आणि २५ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी १९.०० वाजता सुटेल आणि जालना, सेलू, परभणी, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७१०२ पटणा ते औरंगाबाद विशेष गाडी पटणा येथून दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच औरंगाबाद येथे अनुक्रमे दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ आणि दिनांक २९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०७.४५ वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.

गाडी क्रमांक ०७१०३ काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १६:४५ वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक ०७१०४ पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ०७:०० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.

# सोयाबीन प्रश्नावर किसान सभा मैदानात उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

६ फेब्रुवारी रोजी सोयाबीन नोंदणी केलेल्या ४४ हजार ७४४ पैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करून सरकारने सोयाबीन खरेदी केंद्र बंद केल्याने एकूण जिल्हाभरात उर्वरित असलेल्या साधारण ५०% पेक्षाही जास्त सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. त्यामुळं शेतकऱ्यांच दिवाळं निघण्याची वेळ आली आहे. सरकारी खरेदी केंद्र बंद असल्याने खाजगी व्यापारी सुद्धा खरेदीसाठी धजावत नाहीत आणि खरेदी केलीच तर हमीभावाच्या तुलनेत अत्यंत कमी किंमतीत म्हणजे साधारण ३८०० रुपये प्रतिक्विंटल ने खरेदी केला

किंमतीत म्हणजे साधारण ३८०० रुपये प्रतिक्विंटल ने खरेदी केला जातो आहे. यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे या शासकीय खरेदीची तारीख वाढवण्याकडे मोठ्या अश्याने त्यांचे डोळे लागले असताना, परवा पणन मंत्र्यांनी स्पष्टपणे खरेदीसाठी मुदत वाढ नसल्याचे स्पष्ट करून शेतकऱ्यांच्या संयमावरच घाव घातला आहे.

एवढ्यावरच हे शोषण न थांबता ज्या शेतकऱ्यांनी गेल्या दोन महिन्यापासून शासकीय खरेदी केंद्रावर आपले सोयाबीन विक्री केले आहे त्यांचे बिल अद्याप देखील या सरकारने अदा केलेले नाही. आणि त्यामुळे खरेदी झालेल्या शेतकरी सुद्धा अडचणीत आलेला आहे. संबंध राज्यभरात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये या निर्णयाच्या विरोधात रोष दिसत असून त्याचे पडसाद आपल्या जिल्ह्यात आत्ता पाहायला मिळू लागले आहेत. नेहमीच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलनात जिल्हाभर आघाडीवर असलेली किसान सभा या सोयाबीन खरेदी केंद्र प्रश्नावर मैदानात उतरलेली आहे. किसान सभेच्यावतीने उपजिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी जोरदार घोषणाबाजी करून या सरकारी धोरणाचा निषेध करून निदर्शने करण्यात आली. यामध्ये




केंद्र सरकारने सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदत वाढ देवुन संपूर्ण खरेदी होईपर्यंत खरेदी केंद्र चालू ठेवावे २. संपूर्ण सोयाबीन किमान हमीभावानेच खरेदी करा अन्यथा भावांतर योजनेअंतर्गत फरक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा. ३. गेल्या दोन महिन्यापासून खरेदी करत असलेल्या सोयाबीनचे थकीत बील तात्काळ देण्यात यावी या प्रमुख मागण्या करण्यात आल्या

यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष ॲड. अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे, कॉम्रेड उत्तरेश्वर इंगोले रवींद्र देवरवाडे जगन्नाथ घाळे, सय्यद खुर्शीद आत्माराम पवार एडवोकेट शिवाजी कांबळे मस्के सर राष्ट्रपाल पाटोळे मुक्तार भाई व्यंकटेश देशमुख इत्यादी उपस्थित होते

स्टेटमेंट :

शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र बंद करण्याच्या निर्णयातून या सरकारने थेट शेतकऱ्यांच्या लुटीलाचं संमती दिलेली आहे. हे शेतकऱ्यांचे शोषण शेतकरी आणि शेतकऱ्यांची तरुण पोरं सहन करणार नाहीत. आम्ही हा लढा व्यापक करून या सरकारला संपूर्ण सोयाबीन हमीभावाने खरेदी करायला किंवा भावांतर योजनेअंतर्गत फरक देण्यास भाग पाडू आता हे आंदोलन शेतकऱ्यांची पोरं हातात घेतील असा आम्हाला विश्वास आहे अजय बुरांडे (जिल्हाध्यक्ष किसान सभा)

संपादकीय

# तुझे आहे तुजपाशी...



आनंद प्रत्येकाच्या मनात सहज प्रवृत्तीप्रमाणे असतो. कोणाला अगदी क्षुल्लक गोष्टीतही खूप आनंद मिळतो, तर कित्येक जणांना मोठा आनंदही दाखवता येत नाही. सुख मानणे व आनंद घेणं-देणं हे माणसाची नैसर्गिक वृत्ती असते. मात्र हे खरं की, आनंद मनाला रिचार्ज करणारे विनामूल्य टॉनिक आहे. आजकाल धकाधकीच्या जीवनात आनंदाचे क्षण समोर दिसले तरी उपभोगाची मानसिकताच नाही. आपण जाणीवपूर्वक आनंदाचे येणारे क्षण साजरे करायचे आणि मनाचा, शरीराचा उत्साह वाढवायचा. जीवनातील ताण कधी चुकत नाहीत, आणि चुकणारही नाहीत. कारण सुख-दुःख, आनंद -शोक हे जुळे भाऊ आहेत. सुखाचा आनंद मनात जपायचा. दुःखाचा मार बाऊ न करता सोसायचा. आपला जीवनप्रवास आनंदमय करण्यासाठी हे करणं गरजेचं आहे. सकाळी उठून नुसतं निसर्गाकडे पाहिलं की कळतं की, कालचं सुकलेलं फुल जाऊन उद्या उमलणारी कळी वाऱ्यावर डोलत असते. रंगीबेरंगी फुलपाखरे नाचत असतात, सप्तरंगांची निसर्गाची उधळण चालू असते. कशातही खंड पडत नसतो. सकाळी देवालयातून येणारा भजनाचा आवाज, देवापुढे लावलेल्या सुवासिक उदबत्तीचा सुगंध, घरात आरतीच्या वेळेला होणारा घंटानाद आणि नातवंडांची गडबड, मुलांची गडबड मनाला प्रसन्न करून टाकते. डोळे उघडे ठेवून जगावे. आपले भारतीय सण, त्याकरिता केली जाणारी तयारी, सणावारांचा जेवणावळींचा कार्यक्रम मन उत्साही करतो, मनाला चैतन्य देतो. रोजच्या रुटीनमधील बदलही आनंददायी असतो. सामुदायिक कामात, नामस्मरणात, मदत करण्यात, दान सत्पात्री देण्यातला आनंद घ्यावा.कोणालाही बदलण्यापेक्षा जमले तर जुळवून घ्यावे, नाहीतर आपला मार्ग आखावा. मन सतत गुंतले की बारीक सारीक गोष्टींत मोठा आनंद मिळतो. आपण नेहमी चांगल्या विचाराने दुसऱ्याकडे बघितलं की मनातली जळमटं साफ होतात व आनंदाची नवनवीन दिशा सापडते. आनंद घ्यावा, आनंद द्यावा. जगा, जगू द्या या तत्त्वावर आयुष्य रेखावे. आयुष्य सोपं नसतं आणि नव्हतं. अवघड असलं तरी ते कठीणही नसते.

आयुष्य हे नेहमी चढ-उतारांचे असते, खाचखळग्यांचं असतं. मनाचं आरोग्य चांगलं राखलं की तनाचं आरोग्य चांगलं बनतं. असं म्हणतात, मन चंगा तो कठौतीमें गंगा... 'आनंदाचे डोही आनंद तरंग'. खडतर जीवन प्रवास करायचा तर आहेच, पण आनंद या शब्दाशी आपण शरीर व मनाने कायम जवळीक ठेवायची आणि मनाला तशी शिकवण द्यायची. संसारात कित्येक क्षण सुखाचे असतात, पण आपल्या स्वमग्नतेत आणि या आभासी जगात आपण नकळत इतके गुरुफटले गेलोत की हे आनंद क्षण उपभोगायचे आपण विसरूनच गेलो. मैत्रीचे क्षण, बालपणाचे क्षण, शाळा, कॉलेजचे क्षण परत परत आठवावेत, जुन्या लोकांना भेटावं, आठवणी उजळाव्यात आणि मनातला आनंद द्विगुणीत करावा. रोज एका मळलेल्या वाटेने न जाता निरनिराळ्या वाटा चोखाळा, मग पहा आयुष्यातला तोचतोचपणा, एकसुरीपणा हरवून नावीन्य कसं आनंद आणतं. हे जे नावीन्य आहे, तोच जीवनानंद आहे. निसर्गात जीवनानंद आजूबाजूलाही आहे. गुलाबाच्या रंगात आहे, निसर्गाच्या हिरवाईत आहे, नातवंडांच्या साखर स्पर्शात, देवाच्या सान्निध्यातही तो आहे. चाफ्याच्या मोहक वासात आहे, जोडीदाराच्या सहवासात आहे, फार काय मनासारख्या खरेदीतही जीवनानंद आहे. आपण मनाने आणि शरीराने तो उपभोगायचा हे महत्त्वाचं आहे. सारासार विचार दुःखाची संकटांची तीव्रता कमी करतात व सकारात्मकता वाढीला लागते. आपल्याला वयाच्या कोणत्याही टप्प्यावर एकटेपणा नको असतो. जबाबदाऱ्या नीट पार पाडायच्या. वय झालं की सारं आनंदाने पुढच्या पिढीकडे सोपवायचे. मनापासून अलिप्त होताना हा निग्रह करावा लागतो.

# आपला रानटी व राक्षसी देश

आई-वडिलांना सोडून प्राथमिक शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या दुसरीतल्या-नऊ वर्षांच्या मुलग्याचा शाळेच्या संचालकांनी आणि इतरांनी शाळेच्या भरभराटीसाठी 'बळी' द्यावा; ही उत्तर प्रदेशातील घटना अंगावर काटा आणणारी आहे. शाळा जोरात चालावी आणि आपली कर्जे फिटावीत, यासाठी आपल्याच शाळेतील लहानग्याचा गळा आवळून जीव घ्यावा; असे शाळाचालकांना वाटूच कसे शकते? उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्यात ही खासगी शाळा चालविणाऱ्या संचालकाचा बाप व इतरांना या मुलाला बळी म्हणून जिवंतच गाडायचे होते. त्यासाठी त्याला झोपेतच वसतिगृहातून उचलण्यात आले. मात्र, तो जागा झाला आणि रडू लागला. तेव्हा या संचालक व इतरांनी त्याचा नाक व गळा दाबून खून करून टाकला आणि आई-वडिलांना कळविले की तुमच्या मुलाला ताप आला आहे. हा गुन्हा घडल्यानंतर तो उजेडात येण्यास आणि कारवाई होण्यास जो वेळ लागला; तो पाहता हे प्रकरण दडपण्याचा निश्चितच प्रयत्न झालेला दिसतो. या मुलाचे शव घेऊन दवाखान्यांमध्ये जाणाऱ्या शाळाचालकांच्या गाडीवर एका राजकीय पक्षाचा झेंडा होता, असे साक्षीदार सांगत आहेत. हे खरे असेल तर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची 'गुन्हेगारांना धडा शिकविण्याची आणि तात्काळ न्याय देण्याची' भाषा पोकळ व बाष्कळ म्हणायला हवी. आत्ता पाच जणांना अटक झाली असली तरी असा हा 'काळ्या जादू'चा पहिलाच प्रकार नसणार. या शाळेच्या आवारातील विहिरीत जारण-मारण किंवा चेटूक करण्यासाठी लागणारी सामग्री सापडली आहे. तसेच, या मारेकऱ्यांच्या तावडीतून सुटून घरी पळून गेलेला एक छोटा शाळकरी मुलगा 'अंकल ने मेरा गला दबाया था...' असे कॅमेऱ्यासमोर सांगतोच आहे.



या मृत मुलावर ठार करण्यापूर्वी अत्याचार झाले आहेत का, हे तपासात स्पष्ट होईल. पण एकीकडे महत्त्वाकांक्षी शैक्षणिक धोरणे लागू होणाऱ्या आपल्या देशात काय लायकीचे लोक शाळा आणि शैक्षणिक संस्था चालवत आहेत, हे यातून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, आश्रमशाळा, वसतिगृहे यांचीही स्थिती फारशी बरी नाहीच. अर्थात, आपल्यापुढे उत्तर प्रदेशाचाच आदर्श असल्याने त्यात आश्चर्य नाही. गेल्याच वर्षी नाशिक जिल्ह्यात आश्रम-शाळकरी मुलांचा अपमृत्यू झाला होता. अर्थातच, हाथरसमधील हत्येला अंधश्रद्धेच्या विळख्याची जी काळी बाजू आहे, ती भयानक आहे आणि या क्रौर्याची तुलना कशाशीही करणे शक्य नाही. 'आता कुठे काय अंधश्रद्धा..?' असे म्हणण्याची शहरांमध्ये साधारण फॅशन आहे आणि त्यामागे अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवहेलना करण्याचा सूर असतो. ते त्यांचे काम करीतच आहेत. मात्र, धर्माचा, धर्माच्या आचरणाचा आणि धार्मिक समजुती तसेच धर्मश्रद्धांचा प्रवाह स्वच्छ झाल्याशिवाय हे मध्ययुगाला लाजवतील असे गुन्हे थांबणार नाहीत. याची प्रामुख्याने जबाबदारी 'आम्ही हिंदू धर्माचे किंवा धर्मासाठी काम करतो..' असे सांगणाऱ्या सर्व पक्ष, संस्था, संघटना, पंथ, उपपंथ, धर्माचार्य, कीर्तनकार, प्रवचनकार, संत-महंत, बाबा-बुवांची आहे. 'असे वर्तन हा खरा धर्म नाही..' असे या सर्वांनी वारंवार उच्चरवात, सर्वतोपरी सांगितल्याशिवाय असे प्रकार कमी होणार नाहीत. सर्वच धर्मांमधील अशा प्रकारांच्या विरोधात खरे तर राष्ट्रव्यापी मोहीमच उघडायला हवी. तेच खरे धर्मकार्य असेल. मात्र, राजकीय नेतेच नव्या घरात जाताना किंवा जुनी घरे सोडताना अंधश्रद्धा पसरविणारे काळे-कभिन्न विधी करत असतील तर काय बोलणार?उत्तर प्रदेश सरकारला या ओबीसी वर्गातील, वडील अपंग असणाऱ्या निष्पाप मुलाच्या खुनाची तड लावायची असेल तर तातडीने विशेष न्यायालय स्थापावे. पाचही आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. शाळेवर कारवाई करू, असे आता सांगितले जात आहे. मात्र, या शाळा व वसतिगृहाला कायमचे टाळे लावायला हवे. सर्वच राज्य सरकारांनी आपण कुणाला शाळा, आश्रमशाळा, कॉलेजे.. देत आहोत, याचेही जरा आत्मपरीक्षण करावे. हाथरसमधील ही शाळा चालविणाऱ्याचा बाप अशी काळी जादू आधीपासूनच करत आहे. मग या शाळेतील इतरही मुलांवर या आधी असे अघोरी प्रयोग झाले नसतील, कशावरून? त्या दृष्टीने सखोल चौकशी व्हायला हवी. अशा गुन्ह्यांमध्ये 'हा आपल्या पक्षातला व हा विरोधी पक्षातला', असे निकष लागत असतील असल्या पक्षपाती, धृतराष्ट्री सरकारांपेक्षा मोगलाई परवडली. ज्या मुलाचे पालक 'याला आयएएस, आयपीएस बनवू..' अशी स्वप्ने पाहात होते, त्यासाठी त्याला दूर वसतिगृहात ठेवत होते; त्यांच्या हातात शिक्षण क्षेत्रातील या राक्षसांनी अंधश्रद्धेपायी मारून टाकलेल्या मुलाचा निष्प्राण देह ठेवला आहे. काळीज चुरगळून टाकणारी याहून दुसरी मोठी शोकांतिका कोणती असू शकेल? हाही आजचा भारत आहे आणि तो मन पुरते काळवंडून टाकणारा आहे..

# गुंतवणूकदारांना झालंय काय?

मारुतीच्या शेपटीप्रमाणे 'वाढता वाढता वाढे' असा मुंबई शेअर बाजार निर्देशांक आणि निफ्टी फिफ्टी निर्देशांक बघून भारतीय सामान्य गुंतवणूकदार कानात वारं शिरलेल्या बैलासारखे उधळले आहेत की काय, अशी शंका येऊ लागली आहे. आजवर कधीच अशी कृती छोट्या सामान्य गुंतवणूकदारांकडून अनुभवास आली नव्हती. खरोखरच एवढे छोटे सामान्य गुंतवणूकदार काही महिन्यांत आर्थिक साक्षर होऊन शेअर्स व्यवहारात सक्षमपणे आणि स्वतंत्रपणे एवढ्या मोठ्या रकमेचे व्यवहार करू लागलेत की त्यांना वाढणाऱ्या निर्देशांकांची भूल घालून अवास्तव नफ्याची आमिषे दाखवून शेअर बाजारात 'बकरे' बनवले गेले आहेत? हे आणि असे अनेक प्रश्न फेर धरून उभे आहेत. गेल्या दहा वर्षांतील लोकांचा विविध गुंतवणूक माध्यमांत बचत करण्याकडील कल लक्षात घेता खूपच मोठा बदल झाल्याचे आढळते. मागील चार आर्थिक वर्षांत सर्वसामान्य लोकांनी बँक ठेवी मोडून शेअर्स आणि म्युच्युअल फंड्सकडे मोठ्या प्रमाणात आपली बचत वळवली. बँकामधील पुनरावर्ती खाती-रिकरिंग डिपॉझिट बंद करून म्युच्युअल फंडांच्या नियोजनबद्ध गुंतवणूक योजनांना -एसआयपींना आपलेसे केले. परिणामी बँकांच्या ठेवी आणि कर्जांमधील तफावत वाढत गेली. त्यामुळे आता बँकांना रोखे विक्रीतून निधी उभरावा लागत आहे. विद्यमान आर्थिक वर्षांत किमान एक कोटी वीस हजार रुपयांचा निधी या रोखे विक्रीतून उभा केला जाणार आहे. विक्रीस येणाऱ्या रोख्यांपैकी सुमारे ८५ टक्के हिस्सा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा असणार आहे.

ब्ल्यूमबर्ग आणि एसओआयसीच्या सर्वेक्षणांनुसार २०१४मध्ये सर्वसामान्य लोकांची सर्वाधिक बचत बँक ठेवींत असायची. हे प्रमाण एकूण बचतीच्या ३३ टक्के होते, तर बचत खात्यांत २१ टक्के आणि चालू खात्यात ४ टक्के असायची. आयुर्विमा, पेन्शन योजना आणि म्युच्युअल फंडांत अनुक्रमे २३ टक्के, ७ टक्के, आणि ५ टक्के असून शेअर्समध्ये ७ टक्के गुंतवलेले होते, परंतु आता २०२४मध्ये ही सर्व परिमाणे बदलली आहेत. एकूण बचतीच्या २३ टक्के बँक ठेवीत, १७ टक्के बचत खात्यांत आणि चालू खात्यात अवघे २ टक्के आहेत. आयुर्विमा, पेन्शन योजना आणि म्युच्युअल फंडांत अनुक्रमे २१ टक्के, १२ टक्के, आणि ११ टक्के असून शेअर्स मध्ये १२ टक्के गुंतवलेले आहेत. रोखेसंग्रह व्यवस्थापन सेवेत (झचड) आणि पर्यायी गुंतवणूक फंडांत (-खत्र) दोन टक्के आहेत. विविध गुंतवणूक



माध्यमांत गुंतवणूक करताना वैविध्यपूर्ण -उळ- ऽशिळषळशव असली पाहिजे, हे जरी खरे असले तरीही अधिकाधिक जोखीमयुक्त साधनांकडे गुंतवणूकदारांचा झुकलेला कल वेगळेच चित्र पुढ्यात आणतो. हे चित्र निश्चितच भयावह असून त्यांना आर्थिक विवंचनेकडे नेणारे आहे. कोविड काळात घरी बसून काम करताना पगाराबरोबरच किंवा नोकरकपातीचा बळी म्हणून रोजच्या रोज अतिरिक्त उत्पन्न मिळवता येईल, या भ्रमात किंवा आशेने शेअर बाजारात आश्वासक टाकलेले पाऊल नंतरच्या दोन वर्षांत कसे घसरत गेले ते कळलेच नाही. वॉरेन बफे यांची तत्त्वे एका दृष्टिक्षेपात शिकून नियमित वेतनाव्यतिरिक्त चार पैसे (की रुपये ?) अधिक मिळविण्यासाठी शेअर बाजारात काहीही करण्यापर्यंत गेलेली मजल डोळे विस्फारणारी आहे. वायदे बाजारातील (निष्पणक डेरिव्हेटिव्ज) म्हणजेच फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये गेल्या दोन आर्थिक वर्षांत सामान्य छोट्या गुंतवणूकदारांनी केलेले व्यवहार बघून सेबीलाही या व्यवहारांची दखल घ्यावी लागली. आर्थिक वर्ष २०२१-२०२२मध्ये फ्युचर्स आणि ऑप्शन्स मध्ये व्यवहार करणाऱ्या किरकोळ गुंतवणूकदारांची संख्या ५१ लाख होती, ती २०२३-२०२४ मध्ये ९६ लाखांवर पोहोचली होती. आर्थिक वर्ष २०२१-२२च्या अहवालात सेबीने स्पष्ट केले आहे की, फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये गुंतवणूक केलेल्यांपैकी ८९ टक्के गुंतवणूकदारांना तोटा झाला होता. २०२१ ते २०२४ या तीन आर्थिक वर्षांच्या फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये सुमारे एक कोटी दहा लाख गुंतवणूकदारांपैकी ९३ टक्के गुंतवणूकदारांना सरासरी प्रत्येकी किमान दोन लाख रुपयांचा तोटा स्वीकारावा लागला आहे. सर्व गुंतवणूकदारांना झालेल्या तोट्याची एकूण रक्कम एक लाख ८० हजार कोटी रुपयांची आहे. मागील तीन आर्थिक वर्षांत फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये केवळ एक टक्काच गुंतवणूकदारांना एक लाख रुपयांहून अधिक रकमेचा नफा झाला आहे. हे सर्व व्यवहार बघताना एक बाब प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये वैयक्तिक गुंतवणूकदारांनी देशी संस्थात्मक गुंतवणूकदार आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार यांच्या तुलनेत सपाटून मार खाल्ला आहे. देशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ३३ हजार कोटी रुपयांचा तर परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी २८ हजार कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. याच आर्थिक वर्षात वैयक्तिक गुंतवणूकदारांनी ६१ हजार कोटी रुपयांचा तोटा स्वीकारावा लागला आहे. याच व्यवहारांमुळे मागील तीन आर्थिक वर्षांत वैयक्तिक गुंतवणूकदारांकडून ५० हजार कोटी रुपये व्यवहार शुल्क प्राप्त झाले. त्यात दलालांचे कमिशन ५१ टक्के असून २० टक्के बाजारशुल्क होते. एकीकडे फिनएन्फ्ल्युएन्सर दर दिवसाला ऑप्शन्स व्यवहारांतून एक टक्का लाभ मिळवा, असे भासवत असतानाच सेबीच्या अभ्यास अहवालात एक गोष्ट स्पष्ट झाली, ती म्हणजे एकूण गुंतवणूकदारांपैकी फक्त एक टक्काच वैयक्तिक गुंतवणूकदार फक्त एक लाख रुपयांहून अधिक नफा कमावू शकले आहेत. सेबीने अभ्यास केलेल्या मोठ्या पंधरा दलाल पेढ्यांच्या खात्यांमध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये नव्वद टक्के वैयक्तिक गुंतवणूकदार असून त्यापैकी ७५ टक्के लोकांनी राष्ट्रीय शेअर बाजारात फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये व्यवहार केल्याचे उघडकीस आले आहे. ऑप्शन्समध्ये व्यवहार करणाऱ्या छोट्या गुंतवणूकदारांची गेल्या तीन वर्षांतील उलाढाल एक लाख कोटी रुपयांहून अधिक होती आणि त्यांना झालेल्या निव्वळ तोट्याची रक्कम १००३ कोटी रुपये होती. ज्या गुंतवणूकदारांनी प्रत्येकी किमान एक कोटी रुपयांहून अधिक उलाढाल याच कालावधीत केली, त्यांचा एकत्रित तोटा १,४१,६४१ कोटी रुपये होता. वयाच्या पंचविशी-तिशीत असलेल्या युवा पिढीने या फ्युचर्स आणि ऑप्शन्सच्या व्यवहारात अधिक रस घेतल्याचे सिद्ध झाले आहे. आर्थिक वर्ष २३-२४मध्ये या तोट्यात गेलेल्या युवा गुंतवणूकदारांचे प्रमाण ९३ टक्के होते. अशाच व्यवहारात तोटा पदरात पडलेल्या वयाची साठी उलटलेल्या जेष्ठ नागरिकांचे प्रमाण ७९ टक्के होते. ज्या गुंतवणूकदारांचे वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांहून कमी आहे अशा लोकांचे फ्युचर्स आणि ऑप्शन्स व्यवहारात तोटा झालेले प्रमाण ९२.२ टक्के आहे. स्त्री आणि पुरुष अशी गुंतवणूकदारांची वर्गवारी केली तर सरासरी प्रतिस्त्री गुंतवणूकदाराला ७५,९७३ रुपये तर प्रति पुरुष गुंतवणूकदाराला ८८,८०४ रुपये तोटा स्वीकारावा लागल्याचे सिद्ध झाले आहे.या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी स्वतःच्या लोभाला आणि अविवेकी कृतीला आवर घालण्याची वेळ आली आहे. आपल्या कष्टाच्या कमाईचे पैसे असे मातीमोल होणे कोणालाच परवडणारे नाही आणि त्याचे होणारे दूरगामी परिणाम गुंतवणूकदारांच्या कुटुंबव्यवस्थेवर होणार आहेत, याचा तरी गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. अशावेळी नियामक संस्था आणि सरकार यांना दूषणे देण्यापेक्षा स्वतःला वेळीच सावरणे आवश्यक ठरणार आहे. चटकन श्रीमंत होण्यासाठी आपले भविष्य असे पणाला लावण्यापेक्षा म्युच्युअल फंड्स आणि निवडक शेअर्स खरेदीतून प्रदीर्घ टिकणाऱ्या संपत्ती निर्माणाचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे.

# शैक्षणिक संस्थांचे पळवाटांचे धूर्त धडे

सरकारी नियमांचे जोखड मानेवर बसू नये यासाठी पळवाटा कशा शोधायच्या, याचे धडे शिक्षण संस्था स्वतःच धूर्तपणे गिरवत असतात. गोरगरिबांना कोणतेही दाम न मोजता शिक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी विनाअनुदानित शाळांमध्येही राखीव जागा ठेवण्याची योजना आली. मात्र, त्यातून सुटका करून घेण्यासाठी शाळांनी आता अल्पसंख्याक दर्जाची ढाल पुढे केली आहे. मुंबईत अर्ध्याहून अधिक शाळांना अल्पसंख्याक दर्जा आहे. शेजारच्या ठाणे जिल्ह्यातही गेल्या चार वर्षात चारशे शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवून या आरटीई कायद्यातून सुटका करून घेतली आहे. धर्म, भाषा यांच्या आधारे शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा मिळतो. या संस्थांमधील प्रवेश त्याच अल्पसंख्याक श्रेणीतून भरले जातात का, हे कधीच बाहेर येत नाही. अल्पसंख्याक दर्जा म्हणजे आपल्याला हव्या त्या प्रकारे प्रवेश देण्याचे साधन म्हणून कित्येक संस्था वापरतात. महाविद्यालयीन स्तरावरही या दर्जाचा तसाच वापर आजवर होत आला आहे. मुळात सामाजिक न्यायाच्या सदूहेतूने अल्पसंख्याक दर्जा त्या संस्थेला देण्यात आला आहे. मग तोच सदूहेतू लक्षात घेऊन समाजातील वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचे भान या संस्थांनी दाखविणे अपेक्षित होते. त्यांनी ते केलेले नाही व राज्य सरकारनेही त्यांची ही पळवाट सहज स्वीकारून टाकली आहे.मराठी भाषेच्या अनिवार्यतेच्या मुद्द्यावरूनही आजवर या शाळांनी या ढालीचा वापर करून सरकारी सक्तीला वाटाण्याच्या अक्षताच लावल्या. विद्यार्थ्यांची फी असो, गणवेश किंवा काही चालीरीतींची सक्ती याबाबतीतही कॉन्व्हेंट शाळांनी कधीच कुणाला जुमानले नाही. काही वेळा तर सत्ताधीशांनी आम्ही या शाळांचे पाणी तोडू वगैरे पोकळ वल्गनाही केल्या होत्या. रग्गड फी भरून आपल्या पाल्यांना या शाळेत टाकणारे पालक तर हतबलच असतात. लग्नसमारंभांसाठी शाळेचे आवार देऊन या संस्था चांगले उत्पन्न कमावतात. मराठमोळ्या व जुन्याजाणत्या संस्थांना मात्र उत्पन्नाचे असे स्रोत तयार करताना नाकी नऊ येतात व सरकारी वजनकाट्यावर माप तोलत बसावे लागते. मराठीची जपणूक करणाऱ्या शैक्षणिक संस्था टिकाव्यात व नियमांमधून पळवाटा काढणाऱ्या संस्थांचे पितळ उघडे पडावे, यासाठी कोणत्याही सरकारांनी आजवर कधी अंकुश उगारलेला नाही. अर्ध्याअधिक संस्था जर सामाजिक जबाबदारीतून बादच होणार असतील, तर आर्थिक दुर्बलांना शैक्षणिक हक्क प्रदान करण्याचे ईप्सित साध्य तरी कसे होणार ?



## जिल्हयाला अभिमान वाटेल असंच काम माझ्या हातून होईल

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते महासांगवीत भगवान शंकराच्या मूर्तीची थाटात प्राणप्रतिष्ठा

## मी कशाला नवा पक्ष काढेल? चुकीचा अर्थ काढणा-यांना केला खडा सवाल

**पाटोदा (प्रतिनिधी):** पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी माझा प्रत्येक क्षण न क्षण उपयोगात आणला. विकासाबरोबरच समाजातील वंचित पिडित घटकांना न्याय देण्याचे काम केले. आता देखील मला जे खाते मिळाले आहे, त्यातून जिल्हयाला अभिमान वाटेल असेच काम माझ्या हातून होईल असं राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितलं. माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढू नका. मी कशाला नवा पक्ष काढेल? असा खडा सवाल त्यांनी यावेळी केला.

महासांगवी येथे श्रीसंत मीराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, पंचकुंडी महायज्ञ आणि श्री भगवान शंकराच्या मूर्ती प्राण प्रतिष्ठेच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मीराबाई संस्थानच्या मठाधिपती ह.भ.प.राधाताई सानप, उद्योजक विवेक देशपांडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, विजय गोल्हार, मधुकर गर्जे, महेंद्र गर्जे, अजय धोंडे, अनुरथ सानप, सूर्यभान बरके आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, राधाताई सानप महाराज जरी आध्यात्मिक क्षेत्रात असल्या, कीर्तनकार असल्या तरी त्यांच आणि माझं मैत्रीणीचं नात आहे. लोकनेते मुंडे साहेबांपासून मी याठिकाणी दरवर्षी येते ते केवळ आपल्या माणसांसाठी.. राजकारण आणि धर्मकारण यात काम करणारांनी समाजाच्या भल्यासाठी हातात हात घालून काम करण्याची गरज आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी समाजावर केलेले संस्कार विसरून चालणार नाही, त्यांचं सत्व आणि तत्व खूप मोठं होतं. संपूर्ण जीवन समाजाला वाहून देणं एवढं सोप काम नाही असं सांगत माझी भगवान बाबांवर नितांत श्रध्दा आहे, डोळे बंद केले तरी मला ते साक्षात समोर असल्याची जाणीव होते असं त्या म्हणाल्या. याठिकाणी आपण माझे अभूतपूर्व असे जे स्वागत केले त्याने खरोखरच मी भारावून गेले. मोठे हार, गुच्छ यापेक्षा फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करून आपण केलेले स्वागत अंतःकरणातून होते, आपली प्रत्येक पाकळी मला एक एक टन वजनाची वाटली, एवढं प्रेम आपण करता असं त्या म्हणाल्या. पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी माझा प्रत्येक क्षण न क्षण उपयोगात आणला. विकासाबरोबरच समाजातील वंचित पिडित घटकांना न्याय देण्याचे काम केले. आता देखील मला जे खाते मिळाले आहे, त्यातून आपल्याला अभिमान वाटेल असेच काम होईल असं त्या म्हणाल्या. महायुतीत परळी राष्ट्रवादीकडे असली तरी आष्टी भाजपकडे आहे, त्यामुळे याठिकाणी प्रत्येक कामात लक्ष घालणार आहे. याचा अर्थ तुम्हाला पाहिजे तसा घेऊ नका असं त्यांनी आवर्जून सांगितलं.ग्रामविकास खाते असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्याचा निर्णय घेऊन त्यांची होणारी पिळवणूक मी थांबवली असं सांगत हे सर्व करत असताना कुणाच्या चहाची मी मिंधी नाही असं त्यांनी ठणकावून सांगितले. ऊसतोड मजूरांच्या दरात वाढ करून दिली, त्यांच्या प्रश्नांसाठी पुढेही लढत राहू असं त्यात म्हणाल्या.

कोयत्यांना धार देण्यासाठी मी कायम उभी राहील असे म्हणत चुकीचा अर्थ घेऊ नका. मी कोणत्या गुंडाला घाबरत नाही. मी गुंडाला गुंड आणि बंडाला बंड आहे. मी कशामुळे नवीन पक्ष स्थापन करेल? दिल्लीमध्ये नरेंद्रजी मोदी यांची सत्ता आहे.

राज्यात देवेंद्रजी मुख्यमंत्री आहेत. मी स्वतः मंत्री आहे असे असताना मी नवीन पक्ष का काढेल ? असा स्पष्ट सवाल त्यांनी केला.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांवर तुम्ही खूप प्रेम करत होता, त्यांच्या नंतर ते स्थान तुम्ही मला दिले, एवढे प्रेम मी कधीही विसरू शकत नाही. मंत्री म्हणून नाही तर गडाची एक भाविक या नात्याने मी इथे आले, असंच प्रेम कायम रहावे असं सांगून त्या म्हणाल्या, संत भगवान बाबा आणि संत वामनभाऊ यांनी आपल्याकडे अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा सुरू केली ती केवळ तरूण पिढीवर संस्कार, व्यसनापासून दूर आणि चांगले कर्म घडावेत यासाठी सुरू केली. आजच्या तरुणांनी आपल्या संतांचे विचार आचरणात आणून जीवन समृद्ध करावे असं त्या म्हणाल्या. शासकीय बैठका आणि कार्यक्रमाची व्यस्तता असतानाही त्यातून वेळ काढत ना. पंकजाताई मुंडे सप्ताहाच्या सांगता सोहळ्याला खास हेलिकॉप्टर घेऊन महासांगवीत आल्या. यावेळी त्यांचं भाविक आणि ग्रामस्थांच्या जेसीबीतून फुलांची उधळण करत जोरदार स्वागत करण्यात आलं. श्री भगवान शंकराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा यावेळी त्यांच्या हस्ते करण्यात आली.



## संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहा- घोडके

**माजलगाव (प्रतिनिधी):** तालुक्यात गेल्या ३५ वर्षापासून संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे यावर्षी सार्वजनिक एकत्रित जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे तरी या जयंती महोत्सवास उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्ह्याअध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी केले आहे



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संत रविदास महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे तसेच या जयंतीनिमित्त पद्माकर कांबळे (पी.के.) यांच्या वतीने उपहार ची व्यवस्था करण्यात आली आहे या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके उद्घाटक मोहन (दादा) जगताप हे लाभणार आहेत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महामंडळ बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी व जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, उपाध्यक्ष एड. गणेश,गवळी सचिव योगेश शिंदे, कार्याध्यक्ष भगवान सोनवणे,यांच्या सह सदस्य वसंत वाघमारे, व भाजपा अनुसूचित जाती जमाती उपाध्यक्ष सत्यनारायण उणवने आयोजक राजेश जाधव,सचिन कांबळे, सुभाष कांबळे, संतोष जाधव,प्रसाद वाघमोडे, आश्विन खंडागळे, राधाकिसन भाळशंकर, आकाश कांबळे, एड. दत्ता जाधव,विकी मराठे, प्रीतम जाधव,मयूर वाघमारे, संतोष खंडागळे,अर्जुन पोहेकर यांनी आवाहन केले आहे.

## सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे रक्तदान शिबिरात १५० रक्तदात्यांनी केले रक्तदान




**बीड (प्रतिनिधी):** बीड येथील सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्ता समाजसेवक सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात उत्सुकता प्रतिसाद बीड शहरातील युवगांनी देऊन रक्तदान हेच जीवनदान आहे हे बिद्र वाक्य घेऊन असंख्य युवकांनी रक्तदान शिबिररात रक्तदान केले हार रक्तदान शिबिर निमित्त बीड शहरातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन शुभेच्छा दिल्या हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सलीम अध्यक्ष यांच्यासह त्यांच्या मित्र परिवाराने हा रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली गेली १६ १७ वर्षापासून सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते आतापर्यंत हजारो लोकांना या रक्तदानात शिबिरामुळे रक्ताचा कधीही रात्री अपरात्री त्रास झाला नाही समाजसेवक सलीम अध्यक्ष हे नेहमी रुग्णसेवकांसाठी तत्पुर असतात त्यांच्या या कार्याला अनेक सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुकाची थाप देऊन शुभेच्छा दिल्या,व असंख्य सलीम अध्यक्ष युवा मंच सहकार्यांनी रक्तदान यशस्वी केले.सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे १६ १७ वर्षापासून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येते सलीम अध्यक्ष युवा मंच आतापर्यंत केलेल्या अनेक सामाजिक कार्याबद्दल त्यांच्या मित्र परिवाराची त्यांना नेहमी पाठबळ मिळालेला आहे त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे!

## फिनिक्स इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



**पाटोदा (प्रतिनिधी):** शहरातील फिनिक्स इंग्लिश स्कूल या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १० फेब्रुवारी रोजी रेणुका माता मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्नल कल्याणराव डोरले तर प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा दिपाली राजू जाधव , मुख्याध्यापक तुकाराम तुपे, कवियत्री सुरेखा खेडकर, ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी, नगरसेवक उमर चाऊस, मुख्याध्यापक जाधव एल. आर., घुमरे सर, हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून या स्नेहसंमेलाचे उद्घाटन करण्यात आले ,यावेळी कर्नल डोरले साहेब यांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपले विविध कला गुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी भक्ती गीते , लोकगीते, विविध वेशभूषा , विविध विषयावर विद्यार्थ्यांनी कला सादर केल्या कार्यक्रमास शहरातील नागरिक ,पालक , मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या प्राचार्या वर्षा सुहास झानपुरे एकबोटे , अस्मिता देशमुख, प्राजक्ता कुलकर्णी , जया डोरले , गिराम प्राची,शिरीष अनवणे, सुहास झानपुरे यांनी मेहनत घेतली .

## श्रीरामपुरातील २४ व्यावसायिकांची याचिका न्यायालयाने फेटाळली

**श्रीरामपूर । अतुल देसर्डा**

शहरातील सर्कल परिसरातील सुमारे २४ व्यावसायिकांनी अतिक्रमण हटविण्यात येऊ नये म्हणून येथील दिवाणी न्यायालयात याचिका दाखल केला होती. त्यांनी दाखल केलेला दावा न्यायालयाने फेटाळला असून लवकरच त्याठिकाणचे अतिक्रमण काढण्यात येणार असल्याचे पालिकेचे अतिक्रमण विभागाचे शेळके यांनी सांगितले. सध्या शहरात अतिक्रमण हटाव मोहीम जोरात सुरु आहे. अनेक ठिकाणचे अतिक्रमणे काढण्यात आले असून आपले नुकसान होऊ नये म्हणून अनेक व्यावसायिक आपले अतिक्रमणे काढताना दिसत आहे. त्यातच शहरातील सर्कल परिसरातील सुमारे २४ व्यावसायिकांनी श्रीरामपूर दिवाणी न्यायालयात अतिक्रमण काढण्यात येऊ नये म्हणून दावा दाखल केला होता. त्यांचा दावा न्यायालयाने फेटाळला. यामध्ये अजीज खान, राहुल पवार, चंद्रभागा चव्हाण, मतीन शेख, लक्ष्मण पवार, इम्तियाज खान, रफिक सय्यद, भागवत बोंबले, अब्दुल सय्यद, अजित सिंग, सलिम शेख, दीपक मलिक, राजू शेख, अल्ताफ जहागीरदार, अख्तर पठाण, युनूस पठाण, हनुमंत वैष्णव, सचिन आमले, संदीप काळे, नामदेव झरेकर, इम्रान शेख, तनवीर तांबोळी, तेजस वैष्णव, अमोल शिंदे या २४ व्यावसायिकांनी येथील कोर्टात याचिका दाखल केला होती. परंतू त्यांचा दावा न्यायालयाने फेटाळला आहे.काही दिवसांतच या ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात येणार असल्याचे पालिकेच्या अतिक्रमण अधिकार्यांनी सांगितले.



## हरवलेल्या मोबाइलचा शोध जीवावर बेतला

### उड्डाणपुलावर दुचाकीस्वारांचा अपघाती मृत्यू

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड: हरवलेला मोबाइल शोधण्यासाठी पहाटे दुचाकीवर निघालेल्या दोन तरुणांचा जासई उड्डाणपुलावर भीषण अपघातात मृत्यू झाला. सोमवारी सकाळच्या सुमारास उरण-पनवेल मार्गावरील या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दोघांना नवी मुंबईतील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अभिजित आणि अनिष हे दोघे रविवारी रात्री घरी परतले असता अभिजितचा मोबाइल हरविल्याचे लक्षात आले. त्यामुळे पहाटे मित्रासह मोबाइल शोधण्यासाठी तो मोटारसायकलवर निघाला. जासई उड्डाणपुलावर दुचाकी पुढे असलेल्या डंपरला धडकल्याने हा अपघात घडला. अपघात एवढा भीषण होता की दोघांनाही वाचवता आले नाही. ही घटना परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मार्चपर्यंत राज्यात पंचवीस लाख 'लखपती दीदी' करणार

# मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉलची घोषणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

'महालक्ष्मी सरस' हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम झाला आहे. राज्यभरातील बचत गटांना हक्काचं विक्रीचा साधन उपलब्ध व्हाव यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करणार. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात मॉल तयार करणार आहोत.त्याचं बरोबर राज्यात आगामी कालावधीत एक कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान सुरू राहणाऱ्या महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन - २०२५ चे उद्धघाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम,विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले , उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, उमेश चे मुख्य परिचलन अधिकारी परमेश्वर राऊत यांच्यासह राज्यभरातून बचत गटांच्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'महालक्ष्मी सरस' हा गेली २१ वर्ष अविरत सुरू असलेला उपक्रम आहे. उमेदवार अभियानाची प्रगतीचा मी स्वतः साक्षीदार आहे. 'उमेदच्या' माध्यमातून 'महालक्ष्मी सरस' हा राज्यभरात महिला बचत गटांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे.महिला बचतगटांची उत्पादने खूप चांगली असतात. पण यांच्या विक्रीसाठी खूप उपाययोजना कराव्या लागतात. यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसरात उमेद अभियानाच्या माध्यमातून मॉल उभारणार. यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल. प्राथमिक स्तरावर दहा जिल्ह्यांत उमेद मॉल उभारण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बचत गटांमार्फत तयार केलेली वस्तू ही खाजगी कंपनीच्या मालापेक्षा अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून ती अत्यंत माफक दरात उपलब्ध होतात. उमेद च्या माध्यमातून ६० लाख पेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत.या माध्यमातून बचत गटातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दीदी'ही योजना आणली आहे.ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त आहे त्यांना 'लखपती दीदी' म्हटले जाते.आज महाराष्ट्रात ११ लाख पेक्षा जास्त 'लखपती दीदी'आहेत. मार्च २०२५ पर्यंत २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' करणार आहोत.आगामी कालावधीत १ कोटी महिला लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. स्त्रीशक्ती ही आर्थिक विकासाला गती देणारी एक महाशक्ती होईल.बचत गटांच्या माध्यमातून ही चळवळ सुरू झाली आहे.शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी,लाडकी बहिण योजना, एस. टी. मध्ये प्रवास सवलत यासह अनेक महिला सक्षमीकरणाच्या योजना आणल्या आहेत.लाडका भाऊ म्हणून लाडक्या बहिणींच्या विकासासाठी सदैव पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.



# मोटार सायकलच्या पसंती क्रमांकासाठी अर्ज करावेत

**जालना । असलम कुरेशी**

नॉन ट्रान्सपोर्ट टु व्हीलर मोटार सायकल नोंदणी मालिका एमएच २१ सी ई- ही सद्यस्थितीत सुरु असून या मालिकेतील क्रमांकाचे वाटप पूर्ण होत आहे. जिल्ह्यातील नॉन ट्रान्सपोर्ट टु व्हीलर मोटार सायकल वाहनांसाठी एमएच-२१ सी एफ ०००१ ते ९९९९ ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. तरी ज्या वाहनधारकांना आपल्या दुचाकी वाहनासाठी पसंतीचा क्रमांक घ्यावयाचा आहे अशा व्यक्तींनी दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्जासोबत राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ किमतीचा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट, ओळखपत्राच्या (आधारकार्ड) छायांकित प्रतिसह (स्वयंसाक्षांकीत), पॅनकार्ड व दुरध्वनी क्रमांकासह उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना कार्यालयात अर्ज जमा करावा. नवीन मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप 'महाराष्ट्र मोटार वाहन नियम' व परिवहन आयुक्तांचे परिपत्रकानूसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी अनेक अर्जदारांनी अर्ज केल्यास त्यासाठी विहीत पध्दतीने लिलावाची प्रक्रीया अवलंबिण्यात येईल. एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज आलेले असतील तर एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त आलेल्या अर्जदारांनी वाढीव रकमेचा एक धनाकर्ष आणणे आवश्यक आहे. पहिला धनाकर्ष मुळ किंमतीचा व दुसरा धनाकर्ष आपण लावलेल्या बोलीच्या वाढीच्या रकमेचा असावा. धनाकर्ष विहीत शुल्कापेक्षा सर्वात जास्त रकमेचे ज्यांचे असतील त्यांनाच हा क्रमांक आरक्षित करुन दिला जाईल. सर्व संबंधितांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या नावावर आपले धनाकर्ष बंद लिफाफ्यात दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत सादर करावेत. वेळेनंतर कोणत्याही सबबीवर धनाकर्ष जमा करुन घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच दुपारी ३ वाजता बंद लिफाफे उघडण्यात येतील. त्यावेळी सर्व संबंधितांनी उपस्थित राहावे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.



# स.भु.विद्यालयातील विद्यार्थिनीच्या सतर्कतेमुळे फसला अपहरणाचा प्रयत्न

**गंगापूर । प्रा संजय तुपे**



बिडकीन पैठण येथील स. भु. विद्यालयातील एका विद्यार्थिनीचा तिच्या जागृकतेम ळे अपहरणाचा प्रयत्न फसला आहे. बिडकीनपासून सात कि. मी. अंतरावरून तोंडोळी येथील शालेय शिक्षण घेणारी वय १४ वर्षे इयत्ता नववीची विद्यार्थिनी श्री सरस्वती भुवन विद्यालय येथे शिक्षण घेत आहे. शुक्रवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर पायी तोंडोळी येथे घरी जात असताना अज्ञात व्यक्तीने तिच्या वडिलांची ओळख सांगून तिला गाडीवर बसण्यासाठी सांगितले असता तिने समयसूचकता दाखवून अज्ञात व्यक्तीला प्रतिप्रश्न केले. माझ्या वडिलांना फोन लावा व माझे बोलणे करून द्या, असे म्हटल्यानंतर त्या अज्ञात व्यक्तीने फोन मध्ये बॅलन्स नसल्याचे सांगितले. तिला संशय आल्याने त्या मुलीने शाळेत धाव घेतली. तेथे शिक्षक न दिसल्याने नंतर परत गेटवर येऊन परत बघितले असता तेथे तो अज्ञात व्यक्ती दिसला नाही. त्या विद्यार्थिनीने अपहरणाचा प्रयत्न हाणून पाडला. शाळेसमोर झालेली घटना वडिलांना सांगितली असता त्यांनी तत्काळ बिडकीन पोलीसात या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमि वर ग्रामीण भागात दामिनी पथक कायमस्वरूपी नेमण्यात यावे, अशी मागणी बिडकीन ग्रामस्थांकडून होत आहे.

**शाळेत सीसीटीव्ही काही बंद तर काही चालू....**

श्री सरस्वती भुवन शाळेसमोर जर सीसीटीव्ही कॅमेरे असते तर नक्कीच त्यामुळे संबंधित आरोपी लक्षात आला असता. मात्र, या शाळेतील काही कॅमेरे बंद तर काळी सुरू आहेत. दरम्यान मुलीने दाखवलेल्या धाडसाबद्दल तिचा शाळेत सत्कार करण्यात आला.

## मानवी हक्कअभियान कर्मवीर एकनाथरावजी आवाड

# ऊसतोड कामगार संघटनेचे तालुका आरोग्य अधिकारी याना निवेदन

**माजलगाव (प्रतिनिधी):** मानवी हक्क अभियान व कर्मवीर एकनाथरावजी आवाड उसतोड कामगार संघटनेच्या माध्यमातुन निवेदन करण्यात आले.उसतोड कामगार आपल्या मुलाबाळासहीत रखरखत्या उन्हात पोटाची खळगी भरण्यासाठी उसतोडणीचे कसरतीने काम करताना आपण पाहत आहोत. त्यांना राहण्यासाठी चांगला निवारा नसतो. तसेच पिण्याचे पाणीही शुध्द मिळत नाही त्यामुळे लहान मुले, गरोदर महिला, यांच्या आरोग्य संबंधीत आनेक समस्यांना तोड दयावे लागते. कारखानदार तसेच त्या भागातील प्रशासन आरोग्य यंत्रणा राबवत आसताना फारसे दिसुन येत नाही. त्यामुळे त्यांना अनेक समस्याना तोड दयावे लागते



.म्हणून त्यांना कामाच्या ठिकाणी आरोग्य सेवा मिळाली पाहिजे म्हणुन आज दिनांक१०/०२/२०२५ मानवी हक्क अभियान व कर्मवीर एकनाथरावजी आवाड ऊसतोड कामगार संघटना याच्या सयुंक्त माध्यमातून तालुका आरोग्य अधिकारी डॉ.घुबडे यांना माजलगाव तालुक्यातील उसतोड कामगारांची आरोग्य तपासणी करून त्यांना योग्य तो उपचार करण्यात यावा आशा मागणीचे निवेदन मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा जवाहर लाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ.मिलींद (नाना )आवाड साहेब याच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले या प्रसंगी कर्मवीर एकनाथरावजी आवाड ऊसतोड कामगार संघटनेचे तालुका अध्यक्ष बाबासाहेब थोरात, रमेश जाधव, अनंत घडसिंगे, शरद लोखंडे, मच्छिंद्र उफाडे,अक्षय थोरातसह ईतर कार्यकर्ते याची उपस्थित होते. यांना जेष्ठ मार्गदर्शक रमेश गवळी, मधुकर कांबळे, मा.सरपंच पांडुरंग घडसिंगे, मा.सरपंच प्रल्हाद दळवी, कचरू कांबळे, बंडू खंडागळे,कपिल आडागळे, राजेश थोरात, राहुल आवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत-डॉ हनुमंत सौदागर

## संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**केज । प्रतिनिधी**

ध्येय निश्चित केल्याच यश प्राप्ती होते. आई वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते नायगाव येथील संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्ष सहशिक्षक माधव गायकवाड,प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक कावळे एल डी, छात्र मुख्याध्यापक सौरभ खोडसे,सहशिक्षक श्री सोमवंशी, श्री राऊत, श्री वाघमारे, संतोष अडसूळ, गोविंद कुडके, आदींची होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राऊत यांनी करून



विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. पुढे बोलतांना म्हणाले कॉपी पासून दूर राहा.शिक्षणाचा उपयोग व्यवहारीक जीवनामध्ये केला पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाशी आपला संबंध जोडलेला असतो. शिक्षण घेत असताना आपण सर्वप्रथम आपला मार्ग शोधला पाहिजे तरच आपल्याला ते ध्येय साकार करता येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांशी प्रमाणिक राहून अभ्यास करावा यामुळे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करता येईल असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी ऋतुजा सोमवंशी वैष्णवी गुजर यांनी केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# सेवानिवृत्त अधीक्षक उमेश राठोड यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा सत्र न्यायालयातून अधीक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेले उमेश हरिलाल राठोड यांचे कुंभमेळा प्रयागराज येथे जात असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने न्यायालयीन वर्तुळात शोककळा पसरली आहे.न्यायालयीन सेवेत मोलाची भूमिका

उमेश हरिलाल राठोड यांनी बीड जिल्हा सत्र न्यायालयात अनेक वर्षे सेवा बजावली होती. न्यायालयीन प्रशासनात कुशलतेने काम पाहत त्यांनी आपल्या कार्यकुशलतेचा ठसा उमटवला होता. सहकाऱ्यांमध्ये ते मनमिळावू व संयमी स्वभावासाठी परिचित होते.

कुंभमेळ्याच्या यात्रेतच प्रकृती बिघडली ते कुंभमेळ्यासाठी प्रयागराजला जात असताना अचानक अस्वस्थ वाटू लागले. सोबत असलेल्या सहकाऱ्यांनी त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



त्यांच्या जाण्याने कुटुंबीय, सहकारी आणि मित्र परिवारात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दिनांक १३/२/२०२५ रोजी सकाळी १० वाजता बीड येथील अमरधाम मोंढा रोड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

# उरण नगरपालिकेत पाण्यासाठी नागरिकांचा आक्रोश

## जनतेच्या समस्या त्वरित सोडविण्याची मागणी

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण नगरपालिका हद्दीतील आनंद नगर परिसरात गेले महिनाभरापासून अपुरा पाणीपुरवठा नगरपालिके कडून होत आहे.दोन दोन तीन दिवस नगरपालिका कडून पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत यासंदर्भात नगरपालिकेकडे नागरिकांनी लेखी व भेटी देऊन सांगितले आहे.तरीसुद्धा पाणीपुरवठा होताना दिसत नाही नगरपालिकेकडून या संदर्भात कोणतीही उपाययोजना होत नसल्याने शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस व लिबर्टी पार्क सोसायटीचे अध्यक्ष शेखर पाटील यांनी शिष्टमंडळा समवेत नगरपालिकेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांना निवेदन प्रस्तुत केले. यावेळी मुख्याधिकारी समीर जाधव यांनी पाणी प्रश्न सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत लवकरात लवकर पाणी सुरळीत होण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केलेल्या आहेत यावेळी पाणी विभागाच्या प्रमुख वंजारी मॅडम व संतोष कांबळे उपस्थित होते. आनंद नगरच्या पाण्याच्या पाईप गटारातून जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात त्याचबरोबर पाण्याचे प्रेशर वाढवणे पाण्याचे टाइमिंग फिक्स करणे जोपर्यंत नगरपालिकेकडून पाण्याचा नियमित पुरवठा होत नाही तोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करणे ज्या ठिकाणी पाण्याच्या पाईपलाईन लिकेज आहे ते शोधून लिकेज काढणे तसेच एमआयडीसी कडून उरण शहराला अतिरिक्त पाण्याचा साठा वाढवून घेणे या बाबी शहर चिटणीस शेखर पाटील यांनी मांडल्या.नगरपालिकेने या अगोदरच मंगळवार आणि शुक्रवार पाणीपुरवठा बंद केला असताना नागरिकांना उर्वरित दिवसात पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे नगरपालिकेची कोट्यावधींची थकबाकी एमआयडीसी कडे असल्यामुळे एमआयडीसी नगरपालिकेला पाणीपुरवठा करत नाही असे समजते. या संदर्भात नागरिकांनी एमआयडीसीची असलेली थकबाकी नगरपालिकेने भरावी व नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी केली.त्याचबरोबर रांनसाई धरणाचा पाणीपुरवठा बरोबर हेटवणे धरणाचे पाणी नागरिकांसाठी घ्यावे अशा सूचना दिल्या. जर नागरिकांच्या पाण्याचा मूलभूत प्रश्न सुटला नाही तर घटनेच्या अधिकारानुसार आम्हास धरणे आंदोलन मोर्चा या संविधानिक मार्गाचा अवलंब करावा लागेल. नगरपालिकेने लवकरात लवकर उरण शहराला सुरळीत पाणीपुरवठा करावा.असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस व लिबर्टी पार्कचे अध्यक्ष शेखर पाटील यांनी केले आहे. यावेळी शिष्टमंडळासमवेत प्रभाकर तांडेल,बेचैन परदेशी,रोहन म्हात्रे, शरद ठाकुर,जेष्ठ पत्रकार घनश्याम कडू, रवी म्हात्रे आदी उपस्थित होते.



## सुगंधकुट्टी बौद्ध विहार येथे रंगला यशस्वीतांचा सत्कार

# इंजि.राजू जगतकर,आरती बोकरे, आनंद बनसोडे यांच्या कर्तुत्वाचा सत्कार

**परळी । प्रतिनिधी**

सुगंधकुटी बौद्धविहार येथे दर रविवारी बुद्ध वंदेचा कार्यक्रम आयोजित केला जातो.त्या दिनाचे औचित्य साधून परळी शहरातील भिमनगर,जगतकर गल्ली येथील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे परळीची भूमिपुत्र असलेले इंजि.राजू जगतकर, आरती बोकरे व आनंद बनसोडे या मान्यवरांचा दि.९/ २/ २५ रोजी येथील सुगंधकुट्टी बुद्ध विहार येथे सत्कार करण्यात आला. सुरुवातीला बुद्ध वंदना घेऊन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा करून भिमनगर येथील कु.आरती बोकरे हिची अन्न व औषध प्रशासन अधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच आनंद ज्ञानोबा बनसोडे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल व इंजि.राजू श्रावण जगतकर यांची दुबई येथे बुलेटट्रेनच्या ऑपरेशन मॅनेजर पदी भारत देशातून निवड झाल्या बद्दल शाल पुष्पगुच्छ देऊन हृदय सत्कार करण्यात आला. सत्कार ला उत्तर देताना

कु.आरती बोकरे हिने या पदाचा समाजाच्या हितासाठी उपयोग करणार आहे. माझ्यासारखे यशस्वी विद्यार्थी आपल्या भागात



घडविण्यासाठी मी या भागातील मुलांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास कधीही तयार आहे.

तर इंजि. राजू जगतकर यांनी उपस्थित पालकांना समजावून सांगितले की विद्यार्थी कुठल्याही कुठल्याही वळणावर यश की खेचून आणता येते परंतु त्यात सातत्य असणे गरजेचे आहे. यासाठी लवकरच वेगवेगळे शिबिरे व तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शन व्याख्याने आपण या भागात ठेवणार आहोत असे सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी कु.आरती बोकरे करे हिचा सत्कार प्रा.डॉ.यशश्री बालासाहेब जगतकर, रंभा बालासाहेब जगतकर, ज्योती सारनाथ जगतकर, व लिंबूबाई वसंत बनसोडे, यांच्या हस्ते तर आनंद बनसोडे यांचा विलास आदोडे, उत्तम समुद्रे, वसंत बनसोडे, संजय जगतकर, राजेभाऊ जगतकर,आदीच्या हस्ते करण्यात आला तर इंजि.राजू श्रावण जगतकर यांचा सत्कार सोपान ताटे, मिलिंद बनसोडे, शंकरराव साळवे, अशोक जगतकर,एच.टी. वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य सिद्धार्थ जगतकर यांनी तर आभार प्रदर्शन अनिल मस्के यांनी मानले या कार्यक्रमास संपादक बालासाहेब सोपानराव जगतकर, श्रावणराव जगतकर, संपादक बालाजी जगतकर, प्रा. संघपाल समुद्र,प्रा.विलास रोडे, माजी मुख्याध्यापक विनायकराव गडदे, भानुदास जंगले, विकास जगतकर, यश जंगले,दीपक शिरसाट, विलास केदारे, दर्शन ताटे, राज जगतकर किरण तरकसे,अवचारे सुनील, गोदाम,कुणाल गोदाम, संकेत बनसोडे, अरविंद बनसोडे वैजनाथ बनसोडे, सुरेश घाडगे लक्ष्मण जगतकर,अपर्णा बनसोडे,वंदना जंगले, इत्यादी सह बालक, बालिका,महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077